दैनिक पुढारी दि. ८/११/८९

पुढारी ८/११/१९८९

# बी. एच. एम. एस. परीक्षेवेळच्या संशयास्पद प्रकाराची चौकशी

## विद्यापीठ कार्यकारिणी निर्णय : व्ही. टी. पाटील यांना डॉक्टरेट देण्याची शिफारस

**कोल्हापूर, दि. ७ (प्रतिनिधी) : बी. एच. एम. एस.परीक्षेवेळी झालेल्या संशयास्पद प्रकाराची कसून चौकशी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणीने आज घेतला. ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक व अध्यक्ष व्ही. टी. पाटील यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबद्दल त्यांना डि. लिट. ही पदवी देण्याची शिफारस करण्याचा निर्णय आज घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. के. बी. पवार होते.**

व्ही. टी. पाटील यांना डि. लिट्. पदवी देण्याची शिफारस विधिसभेला करण्याचा ठराव कार्यकारिणीने एकमताने मंजूर केला. विद्यार्थिनींची संख्या लक्षात घेऊन विद्यार्थिनींसाठी एक जादा वसतिगृह बांधण्याचा निर्णयही कार्यकारिणीने एकमताने घेतला.

शहरातील होमिओपॅथिक महाविद्यालयाच्या काही विद्यार्थ्यांनी ऑक्टोबर ८९ मध्ये बी. एच. एम. एस. परीक्षेवेळी उत्तरपत्रिकांवर विशिष्ट प्रकारच्या (सांकेतिक) खुणा केल्याचे तपासणी पथकास आढळल्याने याबावत आजच्या बैठकीत चर्चा झाली. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन चौकशी करण्याचे बैठकीत ठरले. सुमारे दीडशे विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकांवर विशिष्ट प्रकारच्या खुणा केल्याचे समजते. या उत्तरपत्रिका कोणाच्या आणि कोणत्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या आहेत, हे ओळखू येण्यासाठीच अशा खुणा करण्यात आल्याची तपासणी पथकाची खात्री पटली.

सुमारे २५-३० विद्यार्थ्यांकडे विशिष्ट प्रकारच्या स्केच पेन्सिल सापडल्याने पथकाच्या संशयाचे रूपांतर खात्रीत झाले. या प्रकारामुळे संबंधित विद्यार्थ्यांचे निकाल राखून ठेवण्यात आले आहेत. या विद्यार्थ्यांमागे वेगळा सूत्रधार आहे काय, याचीही चौकशी होणार आहे. विद्यापीठ नियमानुसार विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय कार्यकारिणीच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला.

विद्यापीठाचे खुले क्रीडा मैदान आणि काही इमारतींच्या विस्तारित बांधकामासही कार्यकारिणीने मान्यता दिली.

लोकसभा निवडणुकीमुळे दि. २० ते २५ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या एम.ई.एस.ई., टी.ई., बी. ई., आणि एम.ई. या अभियांत्रिकी शाखेच्या परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णयही कार्यकारिणीने घेतला. या परीक्षा आता ११ ते १६ डिसेंबर दरम्यान होतील. तसेच वैद्यकीय परीक्षा २४ व २५ नोव्हेंबर हे दिवस वगळून त्यानंतर घेण्यात येतील.

८